# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.
## मा.स्थायी समिती

## कार्यपत्रिका क्रमांक - १५
## सभावृत्तांत

दिनांक - १७.७.२०१२ वेळ - दुपारी ३:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार दिनांक १७.७.२०१२ रोजी दुपारी ३.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.जगदीश शेट्टी सभापती
२) मा.अविनाश (दादा) टेकावडे
३) मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
४) मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
५) मा.छाया जगन्नाथ साबळे
६) मा.जम सोनाली पोपट
७) मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
८) मा.पाडाळे निता विलास
९) मा.जावेद रमजान शेख
१०)मा.जगताप नवनाथ दत्तु
११) मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
१२) मा.भोसले राहुल हनुमंतराव
१३) मा.चोंधे आरती सुरेश
१४) मा.भालेकर अरुणा दिलीप
१५) मा.अश्विनी गजानन चिंचवडे - पाटील
१६) मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

याशिवाय मा.डॉ.श्रीकर परदेशी - आयुक्त, मा.मुंढे, मा.कुलकर्णी, मा.ढेरे, मा.दुरगुडे, मा.बंब - सहा. आयुक्त, मा.चाकणकर - प्र.नगरसचिव, मा.कांबळे - प्र.शहर अभियंता, मा.सुरगुडे -विकास अभियंता, मा.चव्हाण - सह शहर अभियंता, मा. डॉ.जगदाळे - प्र.आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.भदाणे - उपसंचालक (नगररचना), मा.दुधेकर,मा.बनकर, मा.ढगे, मा.निकम, मा.जाधव, मा.कुदळे, मा.चिंचवडे, मा.कपिले, मा.थोरात,मा.जाधव, मा.साळवी, मा.चौधरी, मा.पिरजादे - कार्य.अभियंता, मा.चव्हाण - आरोग्य कार्यकारी अधिकारी, मा.पोमण - संगणक अधिकारी, मा.पाटील - प्रशासन अधिकारी,मा.पाटिल(आय.टी.आय) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले :-

विषय क्रमांक : २२) मानधनावर सहा.सुरक्षा अधिकारी या पदावर नेमणुकीबाबत..

विषय क्रमांक : २३) नेहरुनगर येथील दफनभुमी साई स्वयंरोजगार संस्थेस देखभाल संरक्षणासाठी देणेबाबत..मा.राहुल भोसले,मा.चंद्रकांत वाळके यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक : २४) मनपा रुग्णालयांत इंटर्नशिपसाठी काम करण्याची परवानगी देण्याबाबत..मा.अरुणा भालेकर,मा.अश्विनी चिंचवडे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक : २५) किर्ती विद्यालय या ठिकाणी असलेल्या खोल्या भाडयाने देणेबाबत..मा.अरुणा भालेकर,मा.अश्विनी चिंचवडे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक : २६) सन २०१२ १३ च्या अर्थसंकल्पातील ड प्रभाग व ड मुख्यालयातील कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेबाबत..मा.अरुणा भालेकर,मा.अश्विनी चिंचवडे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक : २७) चिंचवड येथील माचुत्रे व्यायामशाळा सेवाशुल्क तत्वावर देणेबाबत..मा.जावेद शेख,मा.चंद्रकांत वाळके यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक : २८) वीर गोगादेव जन्मोत्सव साजरा करणेबाबत..मा.अविनाश टेकावडे,मा.चंद्रकांत वाळके यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक : २९) दक्षिणमुखी मारुती उद्यान हे सेवाशुल्क तत्वावर देणेबाबत..मा.विनया तापकीर,मा.अविनाश टेकावडे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक : ३०) सन २०१२ - १३ चे अंदाजपत्रक तरतुद वर्ग करणेबाबत..मा.राहुल भोसले,मा.चंद्रकांत वाळके यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक : ३१) प्रभाग क्र.३७ येथील पर्यावरण संस्कार उद्यानाचे देखभालीबाबत..मा.नवनाथ जगताप,मा.राहुल भोसले यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक : ३२) मनपा हद्दीतील ड्रेनेज चेंबर व मॅनहॉल मधील गाळ यांत्रिकी पध्दतीने भाडेतत्वावर काढणेकामी आवश्यक यंत्रणा व मनुष्यबळाचा पुरवठा करणेबाबत..मा.विनया तापकीर,मा.राहुल भोसले यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक : ३३) बालवाडी विद्यार्थ्यांना खाऊ व खेळणी देणेबाबत..मा.चंद्रकांता सोनकांबळे,मा.विनया तापकीर यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक : ३४) युवा मित्र मंडळ इंद्रायणीनगर या संस्थेस संत ज्ञानेश्वर महाराज क्रीडा संकुल सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेबाबत..मा.विनया तापकीर,मा.राहुल भोसले यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक : ३५) पिंपळे गुरव येथील उद्यान चालविण्यास देणेबाबत..मा.नवनाथ जगताप,मा.अविनाश टेकावडे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक : ३६) बहिणाबाई चौधरी सर्पोद्यानात नागपंचमी साजरी करणेबाबत..मा.आरती चोंधे,मा.निता पाडाळे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक : ३७) नागपंचमी निमीत्त आयोजित कार्यक्रमास मान्यता मिळणेबाबत..मा.विनया तापकीर,मा.निता पाडाळे यांचा प्रस्ताव..

---- ----

मा.राहुल भोसले:- मा.स्थायी समिती ठराव क्र.७६५ दिनांक १०/७/२०१२ मध्ये “वनीता देशमुख उद्यान” या मजकुरानंतर “भानुदास ववले उद्यान ” हा मजकुर तसेच मा.स्थायी समिती ठराव क्र. ७७१ दिनांक १०/७/२०१२ मध्ये “संडास ब्लॉक सफाईचे काम ” या मजकुरानंतर “समता विकास सेवा सह संस्था ” हा मजकुर समाविष्ट करण्याची दुरुस्ती करण्यात यावी.

मा.स्थायी समिती ठराव क्र.७६५ दिनांक १०/७/२०१२ मध्ये “वनीता देशमुख उद्यान” या मजकुरानंतर “भानुदास ववले उद्यान ” हा मजकुर तसेच मा.स्थायी समिती ठराव क्र. ७७१ दिनांक १०/७/२०१२ मध्ये “संडास ब्लॉक सफाईचे काम ” या मजकुरानंतर “समता विकास सेवा सह संस्था ” हा मजकुर समाविष्ट करणेत आल्याची दुरुस्ती करण्यात आल्याचे व त्या दुरुस्त्यांसह दिनांक १०/७/२०१२ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १४) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक - ७७५ विषय क्रमांक - १
दिनांक - १७/७/२०१२ विभाग - स्थापत्य विभाग
सुचक :- मा.सुषमा तनपुरे अनुमोदक :- मा.निता पाडाळे
संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जा.क्र.स्था/नि/२ब/कावि/१८४/१२ दि.२८/०६/२०१२

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे --

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील ई.नि.नो.क्र.G३/०४/२०११-१२ मधील अ.क्र.१०२ अन्वये, वॉर्ड क्र.७१ मध्ये ठिकठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविणेकामी मे.कुबेरा एन्टरप्रायझेस (नि.र.रू. २३,३०,१३६/- [र.रू.तेवीस लाख तीस हजार एकशे छत्तीस] पेक्षा १६.०८ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.२०,५३,२२३/- पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा अटी/शर्ती प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिनही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ७७६ विषय क्रमांक - २
दिनांक - १७/७/२०१२ विभाग - स्थापत्य मुख्य कार्या.
सुचक :- मा.जावेद शेख अनुमोदक :- मा.राहुल भोसले
संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जा.क्र.स्था/नि/२ब/कावि/१८५/१२ दि.२८/०६/२०१२

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील ई.नि.नो.क्र.जी४बी/०६/२०११-१२ मधील अ.क्र.१८५ अन्वये, वॉर्ड क्र.५९ व ६० मधील मनपा रूग्णालये व इमारतीना रंगसफेदी करणे व देखभाल दुरुस्ती करणेकामी मे.डी.पी.बाबर (नि.र.रू.१३,९९,९६७/- [र.रू.तेरा लाख नव्यान्नव हजार नऊशे सदुसष्ट] पेक्षा २२.६५ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.११,३७,०१८/- पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा अटी/शर्ती प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिनही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ७७७ विषय क्रमांक - ३
दिनांक - १७/७/२०१२ विभाग - औद्योगिक प्रशिक्षण केंद्र.
सुचक :- मा.चंद्रकांता सोनकांबळे अनुमोदक :- मा.विनया तापकीर
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.औप्रकें/१/कावि/२२१/१२ दि.२८/०६/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवुन -

मनपाच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत महिलांना, मागासवर्गीयांना व अपंगांना संगणक साक्षर करणेसाठी योजना निश्चित केलेली आहे. या योजनेनुसार औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, मोरवाडी यांच्या नियंत्रणाखाली ५ MS-CIT केंद्रावर लाभार्थींना MS-CIT संगणक प्रशिक्षण देणेत येते. पिंपळेगुरव व भोसरी या दोन MS-CIT केंद्रावर माहे एप्रिल २०१२ चे बॅच करिता एकूण १७३ लाभार्थींनी प्रवेश घेतला असून या लाभार्थींचे प्रति प्रशिक्षण शुल्क र.रू.२,८००/- प्रमाणे एकूण र.रू.४,८४,४००/- व पिंपळेगुरव, निगडी, केशवनगर या केंद्रावर माहे मे २०१२ चे बॅच करिता एकूण ३८५ लाभार्थींनी प्रवेश घेतला असून त्या लाभार्थींचे प्रति लाभार्थी शुल्क र.रू.९६०/- प्रमाणे एकूण र.रू.३,६९,६००/- रक्कम महाराष्ट्र नॉलेज कार्पोरेशन लिमि. यांना अदा करणेत आली असल्याने प्रस्तुतच्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रत्येक प्रभागात चार एम.एस.सी.आय.टी प्रशिक्षण केंद्रे सुरु करणेस व प्रशिक्षण देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ७७८ विषय क्रमांक - ४
दिनांक - १७/७/२०१२ विभाग - मध्यवर्ती भांडार
सुचक :- मा.अश्विनी चिंचवडे अनुमोदक :- मा.चंद्रकांता सोनकांबळे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मभां/२/कावि/१५०/१२ दि.२७/०६/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे --

मनपाच्या संगणक यंत्रणेचे Network Security Audit करणेकामी मे.Appin Software Security Pvt. Ltd. दिल्ली यांचे प्राप्त लघुत्तम निविदा दर र.रू.६,८५,७७०/- हे अंदाजपत्रकीय र.रू.३०,००,०००/- चे तुलनेत ७७.१४ % ने कमी असल्याने मा.आयुक्तसाो. यांनी स्विकृत केलेले आहेत. त्यांना र.रू.६,८५,७७०/- कामाचा आदेश देण्यात आलेला असून मे.Appin Software Security Pvt. Ltd. दिल्ली यांनी सदर कामापोटी केलेल्या करारनाम्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ७७९ विषय क्रमांक - ५
दिनांक - १७/७/२०१२ विभाग -स्थापत्य ब मुख्यालय
सुचक :- मा.नवनाथ जगताप अनुमोदक :- मा.चंद्रकांत वाळके
संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जा.क्र.स्था/नि/२ब/कावि/१८६/१२ दि.३०/०६/२०१२

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे - -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील ई.नि.नो.क्र.३९/२०११-१२ मधील अ.क्र.१ अन्वये, चाफेकर चौक चिंचवड येथील नवीन स्मारकाचे उभारणीकामी क्रांतीवीरांचे पुतळे (समुह शिल्प) बनविणेकामी मे.आल्हाट आर्ट स्टुडीओ (नि.र.रू.१४,००,०००/- [र.रू.चौदा लाख] या दराने) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.१४,००,०००/- पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा अटी/शर्तीस अधीन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ७८० विषय क्रमांक - ६
दिनांक - १७/७/२०१२ विभाग -जलनिःसारण
सुचक :- मा.सुषमा तनपुरे अनुमोदक :- मा.निता पाडाळे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.जनि/नि/कावि/८६४/१२ दि.२/०७/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या जलनिःसारण विभागाकडील नि.नो.क्र. JNNURM/१/२०१२-१३ मधील अ.क्र.१ अन्वये, Providing, designing, Installing, Integrating, Testing, & Commissioning Automation with PLC / SCADA for STP & SPS at various locations in PCMC area along with operation & maintenance for a period of 5 years कामी मे.चेतास कंट्रोल सिस्टिम प्रा.लि. (नि.र.रू.५,७३,९५,३५९/- [र.रू.पाच कोटी त्र्याहत्तर लाख पंच्यान्नव हजार तीनशे एकोणसाठ] पेक्षा १६ % कमी) या ठेकेदाराकडून करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक - ७८१ विषय क्रमांक - ७
दिनांक - १७/७/२०१२ विभाग -मध्यवर्ती भांडार
सुचक :- मा.अरुणा भालेकर अनुमोदक :- मा.जावेद शेख
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मभां/१/कावि/३१०/१२ दि.३/७/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे --

मनपाचे विद्युत विभागासाठी विद्युत विषयक किरकोळ साहित्य खरेदीकामी ई-नि.क्र.२४/११-२०११/१२ अन्वये लघुत्तम निविदाकार मे.सुरज स्विचगेअर कं., भोसरी यांचे विविध विद्युत विषयक किरकोळ साहित्य बाब क्र.४, ५, ६ साहित्याचे दर एकूण र.रू.५,८७,१००/- तसेच मे.लुंकड इलेक्ट्रीकल्स, दापोडी यांचे बाब क्र.१, २, ७ साहित्याचे दर एकूण र.रू.१,५७,५००/- दर स्विकृत करून, करारनामा करून पुरवठा आदेश निर्गत केलेला असल्याने प्रस्तुतकामी केलेल्या संविदेची माहिती अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक - ७८२ विषय क्रमांक - ८
दिनांक - १७/७/२०१२ विभाग - क प्रभाग कार्यालय
सुचक :- मा.अरुणा भालेकर अनुमोदक :- मा.विनया तापकीर
संदर्भ:- मा.प्रभाग अधिकारी यांचे जा.क्र.कप्र/१५/कावि/७४५/१२.दि.४/७/२०१२

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे - -

मनपाचे वतीने सन २००२ मध्ये संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान राबविणेत आले होते. सदर अभियानांतर्गत पुर्वतयारी व बैठक खर्चासाठी डॉ.के.जी.पठाण, भारती विद्यापीठ, पुणे यांना र.रू.९,५००/- आगाऊ रक्कम अदा करणेत आली होती. डॉ.के.जी.पठाण यांनी सदर कार्यक्रमाचे आयोजन करून त्याकामी आलेल्या एकूण र.रू.९,२५०/- चे बीले सादर केलेली असून उर्वरित र.रू.२५०/- पावती क्र.६६१३ दि.७/१/१२ अन्वये कोषागरात जमा केलेले असल्याने सदर झालेल्या र.रू. ९,२५०/- [र.रू.नऊ हजार दोनशे पन्नास] खर्चाचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक - ७८३ विषय क्रमांक - ९
दिनांक - १७/७/२०१२ विभाग - ब प्रभाग विद्युत
सुचक :- मा.सुषमा तनपुरे अनुमोदक :- मा.राहुल भोसले
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.बप्र/वि/जा/३५९/१२.दि.६/७/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

रावेत येथील मुकाई चौक ते भक्ती-शक्ती चौक या रस्त्याचे कामात अडथळा करणारा EHV टॉवर शिफ्ट करणेच्या कामाचे सर्व्हे चार्जेस र.रू.१५,०००/- [र.रू.पंधरा हजार] महापारेषण कंपनीला अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक - ७८४ विषय क्रमांक - १०
दिनांक - १७/७/२०१२ विभाग - विद्युत विभाग क प्रभाग
सुचक :- मा.चंद्रकांत वाळके अनुमोदक :- मा.निता पाडाळे
संदर्भः- मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.कप्र/वि/जा/५०४/१२.दि.६/७/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

भोसरी विद्युत दाहिनी तीन वर्षाकरिता चालन देखभाल व दुरुस्ती करणे कामाचे र.रू.८,१६,६७७/- इतक्या वाढीव खर्चास म्हणजेच एकूण र.रू.३७,५६,६६७/- [र.रू.सदोतीस लाख छपन्न हजार सहाशे सदुसष्ट] चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक - ७८५ विषय क्रमांक - ११
दिनांक - १७/७/२०१२ विभाग - स्थापत्य ब मुख्यालय
सुचक :- मा.छाया साबळे अनुमोदक :- मा.चंद्रकांता सोनकांबळे
संदर्भः- मा.प्रभाग अधिकारी यांचे जा.क्र.स्था/बमु/काअ/११/८६/२०१२.दि.६/७/२०१२

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

प्रभाग क्र.३२, संततुकारामनगर येथील तुकाराम बीज महोत्सवा साठी व इतर कार्यक्रमांसाठी मंडप व्यवस्था पुरविणे कामास यापुर्वी मान्यता घेतलेली रक्कम रू.५,६०,२२०/- व येणारे वाढीव अंदाजपत्रकीय र.रू.४,२९,७८०/- अशी एकूण र.रू. ९,९०,०००/- [र.रू.नऊ लाख नव्वद हजार] चे सुधारित खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक - ७८६ विषय क्रमांक - १२
दिनांक - १७/७/२०१२ विभाग - मुख्य लेखा परिक्षक
सुचक :- मा.अरुणा भालेकर अनुमोदक :- मा.सुषमा तनपुरे
संदर्भः- मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे जा.क्र.मुलेप/१/कावि/३४/२०१२.दि.५/७/२०१२

प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.२८.५.१२ ते ३.६.१२ अखेर संपणा-या आठवड्याचा, मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/३४/२०१२ दि.५.७.२०१२ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक - ७८७ विषय क्रमांक - १३
दिनांक - १७/७/२०१२ विभाग - मुख्य लेखा परिक्षक
सुचक :- मा.आरती चोंधे अनुमोदक :- मा.सुभद्रा ठोंबरे
संदर्भः- मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे जा.क्र.मुलेप/१/कावि/३५/२०१२.दि.५/७/२०१२

प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.४.६.१२ ते १०.६.१२ अखेर संपणा-या आठवड्याचा, मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/३५/२०१२ दि.५.७.२०१२ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक - ७८८ विषय क्रमांक - १४
दिनांक - १७/७/२०१२ विभाग - मुख्य लेखा परिक्षक
सुचक :- मा.अविनाश टेकावडे अनुमोदक :- मा.निता पाडाळे
संदर्भः- मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे जा.क्र.मुलेप/१/कावि/३६/२०१२.दि.५/७/२०१२

प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.११.६.१२ ते १७.६.१२ अखेर संपणा-या आठवड्याचा, मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/३६/२०१२ दि.५.७.२०१२ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक - ७८९ विषय क्रमांक - १५
दिनांक - १७/७/२०१२ विभाग - मुख्य लेखा परिक्षक
सुचक :- मा.सुभद्रा ठोंबरे अनुमोदक :- मा.जावेद शेख
संदर्भः- मा.मुख्यलेखा परिक्षक यांचे जा.क्र.मुलेप/१/कावि/३७/२०१२.दि.५/७/२०१२

प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.१८.६.१२ ते २४.६.१२ अखेर संपणा-या आठवड्याचा, मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/३७/२०१२ दि.५.७.२०१२ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक - ७९० विषय क्रमांक - १६
दिनांक - १७/७/२०१२ विभाग - मुख्य लेखा परिक्षक
सुचक :- मा.राहुल भोसले अनुमोदक :- मा.छाया साबळे
संदर्भः- मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे जा.क्र.मुलेप/१/कावि/३९/२०१२.दि.९/७/२०१२

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागाकडील माहे मे २०१२ मधिल अद्ययावत एकूण कामकाज विषयक क्र.मुलेप/१/कावि/३९/२०१२ दिनांक ०९/०७/२०१२ अन्वये पाठविलेला गोषवारा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक - ७९१ विषय क्रमांक - १७
दिनांक - १७/७/२०१२ विभाग - स्थापत्य
सुचक :- मा.चंद्रकांत वाळके अनुमोदक :- मा.नवनाथ जगताप
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/४ड/कावि/७/२०१२.दि.१०/७/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवुन -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.G१/२१/२४/ २०११/१२ मधील अ.क्र.२२ अन्वये, वॉर्ड क्र.७५ पिंपळे सौंदागर येथे पेट्रोल पंप ते मिलिटरी हद्दी पर्यंतच्या १८.०० मी.डी.पी. रस्त्याची सुधारणा करणेकामी मे.व्ही.एम.मातेरे इंफ्रास्ट्रक्चर प्रा. लि. (नि.र.रू.९३,३७,०६८/-[र.रू.त्र्यान्नव लाख सतोदीस हजार अडुसष्ट] पेक्षा (१४% जास्त) ०.४०% जास्त (सुधारित दर) या ठेकेदाराकडुन निविदा दर मंजुर दराने र.रू.९३,७४,४१६/- ऐवजी निविदा रकमेपर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तीनही मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचे बरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक - ७९२ विषय क्रमांक - १८
दिनांक - १७/७/२०१२ विभाग - जनतासंपर्क
सुचक :- मा.सुषमा तनपुरे अनुमोदक :- मा.निता पाडाळे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.जसं/६/कावि/१४४/२०१२.दि.१०/७/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

म.न.पा. कामकाजाकरीता नविन एक कॅमेरा व त्याचे इतर साहित्य खरेदीकामी आलेल्या र.रु.१,६१,४१५/- (अक्षरी र.रु.एक लाख एकसष्ट हजार चारशे पंधरा फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक - ७९३ विषय क्रमांक - १९
दिनांक - १७/७/२०१२ विभाग - वायसीएमएच
सुचक :- मा.अविनाश टेकावडे अनुमोदक :- मा.अश्विनी चिंचवडे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वायसीएमएच/ॲकॅड/कावि/१९९/२०१२.
दि.११/७/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

सन २०१२-१३ च्या मुळ अंदाजपत्रकात वैद्यकीय शिक्षण फी या लेखाशिर्षावर तरतूद वर्ग करुन घेणे क्रमप्राप्त झालेने वायसीएमएच विभागाच्या अंदाजपत्रकाच्या अंतर्गतच असलेल्या उपकरणे खरेदी लेखाशिर्षावर सन २०१२-१३ साठी रु.२,८०,००,०००/- ची तरतुद केली आहे. त्या लेखाशिर्षावरील संभाव्य खर्च विचारात घेऊन त्यामधुन र.रु.१०,००,०००/- वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक - ७९४ विषय क्रमांक - २०
दिनांक - १७/७/२०१२ विभाग - जेएनएनयुआरएम कक्ष
सुचक :- मा.राहुल भोसले अनुमोदक :- मा.निता पाडाळे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.जेएनएनयुआरएम/०३/कावि/२६७/२०१२. दि.१२/७/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभियान (JNNURM) अंतर्गत महापालिकेचे प्रकल्पांबाबत चित्रफित (Documentary Film) तयार करणेकामी एकुण र.रु.२,४७,१९२/- इतक्या खर्चास व सदरचे कामकाज मे.Padmashri Production (P) Ltd. Pune यांचेकडुन थेट पद्धतीने तथापि, कामाचा करारनामा करुन घेऊन सदरचा खर्च हा जेएनएनयुआरएम विभागाकडील “राखीव निधीमधील JNNURM निधी प्रकल्प खर्च” या लेखाशिर्षामधून करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक - ७९५ विषय क्रमांक - २१
दिनांक - १७/७/२०१२ विभाग - मुख्य लेखा परिक्षक
सुचक :- मा.सुषमा तनपुरे अनुमोदक :- मा.जावेद शेख
संदर्भ:- मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे जा.क्र.मुलेप/०१/कावि/४०/२०१२. दि.१२/७/२०१२

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील माहे जून २०१२ मधील, अद्ययावत एकूण कामकाज विषयक क्र.मुलेप/१/कावि/४०/२०१२ दि.१२.७.२०१२ अन्वये पाठविलेला गोषवारा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

<u>सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.</u>

ठराव क्रमांक - ७९६ विषय क्रमांक - २२
दिनांक - १७/७/२०१२ विभाग - सुरक्षा
सुचक :- मा.सुषमा तनपुरे अनुमोदक :- मा.जावेद शेख
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.सुवि/५/कावि/३५४/२०१२. दि.१३/६/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सुरक्षा विभागाचे आस्थापनेवर सहा.सुरक्षा अधिकारी अभिनामाचे एक पद रिक्त असुन सुरक्षा व्यवस्थेकामी या पदाची आवश्यकता असल्याने सदर पदावर श्री.पाटील रामराव जयवंत यांची एकत्रीत मानधनावर दिनांक २४/०१/२०१२ ते २३/०७/२०१२ अखेर ६ महिने कालावधी करिता नेमणुक करणेत आली होती. सुरक्षा व्यवस्थेचे काम हे अत्यावश्यक सेवेत येत असल्याने व सुरक्षा विभागास सदर पदाची आवश्यकता असल्याने श्री.पाटील रामराव

जयवंत यांची मुदत दिनांक २३/७/२०१२ रोजी संपुष्टात येत असल्याने सुरक्षा विभागाची आवश्यकता लक्षात घेवुन पुढील ६ महिने कालावधी करिता त्यांची नेमणुक सहा.सुरक्षा अधिकारी या पदावर दरमहा र.रु.२०,०००/- एकत्रीत मानधनावर नेमणुकीस तसेच याकामी येणा-या प्रशासकीय खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक - ७९७ विषय क्रमांक - २३

दिनांक - १७/७/२०१२

सुचक :- मा.राहुल भोसले अनुमोदक :- मा.चंद्रकांत वाळके

संदर्भ:- मा.राहुल भोसले,मा.चंद्रकांत वाळके यांचा प्रस्ताव -

ईदगाह कबरस्थान दफन भूमी, नेहरुनगर साई स्वयंरोजगार सहकारी संस्था मर्यादित, नेहरुनगर या संस्थेस तीन वर्षे कालावधीकरीता देखभाल संरक्षणाकामी मनपा दराने देण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मंजुरी देण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक - ७९८ विषय क्रमांक - २४

दिनांक - १७/७/२०१२

सुचक :- मा.अरुणा भालेकर अनुमोदक :- मा.अश्विनी चिंचवडे

संदर्भ:- मा.अरुणा भालेकर,मा.अश्विनी चिंचवडे यांचा प्रस्ताव -

स्व.श्री फकीरभाई पानसरे शैक्षणिक फौंडेशन या शैक्षणिक संस्थेला वैद्यकिय शिक्षण अभ्यासक्रमासाठी, पिंपरी चिंचवड मनपा च्या सर्व रुग्णालयात आंतररुग्ण (Indoor) तसेच बाहयरुग्ण (Outdoor) विभागात त्यांच्या संस्थेच्या विद्यार्थ्यांसाठी, तसेच इंटर्नशिपसाठी काम करण्याची पुढील १० वर्षांची परवानगी देण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता ठरावाची अंमलबजावणी करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक - ७९९ विषय क्रमांक - २५

दिनांक - १७/७/२०१२

सुचक :- मा.अरुणा भालेकर अनुमोदक :- मा.अश्विनी चिंचवडे

संदर्भ:- मा.अरुणा भालेकर,मा.अश्विनी चिंचवडे यांचा प्रस्ताव -

स्व.श्री फकीरभाई पानसरे एजुकेशन फाऊंडेशन या संस्थेस किर्ती विद्यालय या ठिकाणी रिक्त असलेल्या खोल्या ५ वर्षे भाडेपट्टीच्या तसेच नगररचना ठरवून देईल त्या भाडेदराने व योग्य त्या अटी व शर्तीनुसार व त्याकामी करारनामा करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक - ८००　　　　　　　　　　विषय क्रमांक - २६

दिनांक - १७/७/२०१२

सुचक :- मा.अरुणा भालेकर　　　　　　　　अनुमोदक :- मा.अश्विनी चिंचवडे

संदर्भ:- मा.अरुणा भालेकर,मा.अश्विनी चिंचवडे यांचा प्रस्ताव -

सन २०१२ १३ च्या अर्थसंकल्पातील ड प्रभाग व ड मुख्यालयातील कामांच्या तरतुदींमध्ये फेरबदल करावयाचा असल्याने प्रस्तावात नमुद प्रमाणे कामाच्या तरतुदीत फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक - ८०१　　　　　　　　　　विषय क्रमांक - २७

दिनांक - १७/७/२०१२

सुचक :- मा.जावेद शेख　　　　　　　　अनुमोदक :- मा.चंद्रकांत वाळके

संदर्भ:- मा.जावेद शेख,मा.चंद्रकांत वाळके यांचा प्रस्ताव -

चिंचवड येथील वस्ताद मुरलीधर माचुत्रे व्यायामशाळा ३ वर्षे कालावधीसाठी कै.मुरलीधर किसनराव माचुत्रे स्मृती जाणता राजा प्रतिष्ठान संस्थेस योग्य त्या अंशतः सेवा शुल्क तत्वावर देखभाल संरक्षण व चालनकामी देण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक - ८०२　　　　　　　　　　विषय क्रमांक - २८

दिनांक - १७/७/२०१२

सुचक :- मा.अविनाश टेकावडे　　　　　　　　अनुमोदक :- मा.चंद्रकांत वाळके

संदर्भ:- मा.अविनाश टेकावडे,मा.चंद्रकांत वाळके यांचा प्रस्ताव -

सालाबादाप्रमाणे यंदाही वीर गोगादेव जन्मोत्सव दिनांक ४/८/१२ रोजी केशव ठाकरे (स्केटिंग ग्राउंड) मैदान येथे साजरा करणे कामी निविदा न मागविता मंडप, विद्युत, स्पीकर, खुर्च्या व इतर अनुषंगिक सोई सुविधा मनपातर्फे उपलब्ध करुन देण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मंजुरी देण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक - ८०३　　　　　　　　　　विषय क्रमांक - २९

दिनांक - १७/७/२०१२

सुचक :- मा.विनया तापकीर　　　　　　　　अनुमोदक :- मा.अविनाश टेकावडे

संदर्भ:- मा.विनया तापकीर,मा.अविनाश टेकावडे यांचा प्रस्ताव -

दक्षिण मुखी मारुती उद्यान सिंधुनगर LIC, से.२५ हे तीन वर्षे कालावधीसाठी योग्य त्या अंशतः सेवा शुल्क तत्वावर देखभाल संरक्षणाकामी जनसेवा स्वयंरोजगार संस्थेस देण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक - ८०४ विषय क्रमांक - ३०

दिनांक - १७/७/२०१२

सुचक :- मा.राहुल भोसले अनुमोदक :- मा.चंद्रकांत वाळके

संदर्भ:- मा.राहुल भोसले,मा.चंद्रकांत वाळके यांचा प्रस्ताव -

महानगरपालिकेच्या सन २०१२-१३ चे अंदाजपत्रकामध्ये क प्रभागातील कामांसाठी प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे तरतुद वर्गीकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक - ८०५ विषय क्रमांक - ३१

दिनांक - १७/७/२०१२

सुचक :- मा.नवनाथ जगताप अनुमोदक :- मा.राहुल भोसले

संदर्भ:- मा.नवनाथ जगताप,मा.राहुल भोसले यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्र.३७ मनपाचे पर्यावरण संस्कार उद्यान भोसरी या उद्यानाचे देखभालीचे काम जनविकास स्वयंरोजगार सेवा संस्था या संस्थेस मनपाचे सध्याचे प्रचलित मंजुर दराने ५ वर्षे कालावधीसाठी देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक - ८०६ विषय क्रमांक - ३२

दिनांक - १७/७/२०१२

सुचक :- मा.विनया तापकीर अनुमोदक :- मा.राहूल भोसले

संदर्भ:- मा. विनया तापकीर, मा.राहूल भोसले यांचा प्रस्ताव.

मनपाच्या सिवर लाईन चोकअपचे काम मे.बॅबोलॅट असोशिएटस् पुणे यांचेमार्फत करणेत येत आहे. निविदा सुचना क्र.३/२०१०-११ दि. ३/८/२०१० कामाचा आदेश क्र.काशा/१ /कावि/१३६६ / २०११, दि.२३/१२/२०११ नुसार बॅबोलॅट असोशिएटस् यांनी उच्च क्षमतेच्या सक्शन ट्रक १ नग व पुरवणी क प्रमाणे चारही प्रभागात मिळून एक जेटींग ट्रक हा ड्रेनेज लाईन साफसफाईसाठी कार्यरत केला आहे. पालिकेच्या दैनंदिन चोकअपचे प्रमाण पाहता सर्व प्रभागात मिळून एक सक्शन ट्रक (MAN) व एकलाईन सफाईची यंत्रणा कमी पडत आहे. सदर MAN ट्रकचे कार्य विचारात घेता प्रभागाचे अधिकारी व नगरसेवकांचे MAN ट्रकची वारंवार येणारी मागणी लक्षात घेता सदर MAN सक्शन ट्रक व लाईन साफसफाईची यंत्रणा प्रत्येक प्रभागात एक या प्रमाणे एकूण ३ MAN ट्रक व ३ लाईन सफाईची यंत्रणा (जेटींग) मे.बॅबोलॅट असोशिएटस् यांच्याकडून वाढीव यंत्रणा घेणेत यावी म्हणजे या प्रमाणे प्रत्येक चारही प्रभागासाठी प्रत्येकी एक MAN सक्शन ट्रक व एक लाईन सफाईसाठी (जेटींग) ट्रक उपलब्ध झाल्यास कामकाजाचा निपटारा होणे सोपे जाईल तरी यापूर्वी मंजूर झालेल्या मा.स्थायी समिती सभा ठ.क्र. १६२३० दि. ९/१२/२०११ या ठरावामध्ये दुरुस्ती करुन सदर वाढीव कामकाजासाठी सुधारित करारनामा वाढीव खर्चासह (सदर वाढीव यंत्रणेचे दर हे झालेल्या करारनाम्यानुसार प्रती रनिंग मिटर / प्रति चेंबर प्रचलित दरानुसार देण्यात यावेत ) करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ८०७ विषय क्रमांक - ३३

दिनांक - १७/७/२०१२

सुचक :- मा. चंद्रकांता सोनकांबळे अनुमोदक :- मा.विनया तापकीर

संदर्भः- मा.चंद्रकांता सोनकांबळे, मा. विनया तापकीर यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शाळांमधील बालवाडीं विद्यार्थ्यांना महानगरपालिकेच्यावतीने दररोज खाऊ देणेस तसेच सर्व विद्यार्थ्यांना खेळण्यांचीही व्यवस्था करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ८०८ विषय क्रमांक - ३४

दिनांक - १७/७/२०१२

सुचक :- मा.विनया तापकीर अनुमोदक :- मा.राहूल भोसले

संदर्भः- मा. विनया तापकीर, मा.राहूल भोसले यांचा प्रस्ताव.

युवा मित्रमंडळ इंद्रायणीनगर या संस्थेस संत ज्ञानेश्वर महाराज क्रिडा संकुल इंद्रायणीनगर हे देखभाल, चालन, प्रशिक्षणाकामी योग्य त्या अंशतः सेवा शुल्क तत्वावर देण्यास व याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ८०९ विषय क्रमांक - ३५

दिनांक - १७/७/२०१२

सुचक :- मा.नवनाथ जगताप अनुमोदक :- मा.अविनाश टेकावडे

संदर्भः- मा. नवनाथ जगताप, मा.अविनाश टेकावडे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे पिंपळे गुरव येथील स.नं.७२/२ येथील उद्यान देखभाल, विकास व संरक्षणाकामी या क्षेत्रातील अनुभवी मे.क्रिएटिव्ह बिझीनेस असोशिएटस्, गणेश अपार्टमेंट, माहिम, मुंबई या संस्थेस मनपा दराने ११ महिन्यांसाठी देखभालीस देणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृतांत कायम होणेची वाट न पाहता अंमलबजावणी तातडीने करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ८१० विषय क्रमांक - ३६

दिनांक - १७/७/२०१२

सुचक :- मा.आरती चौंधे अनुमोदक :- मा.निता पाडाळे

संदर्भः- मा.आरती चौंधे, मा.निता पाडाळे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या संभाजीनगर वॉर्ड क्र. ९ मधील निसर्ग कवी बहिणाबाई चौधरी सर्पोद्योनात सालाबाद प्रमाणे यावर्षीही नागपंचमी सण साजरा केला जाणार आहे. गेली २० वर्षे या सणामध्ये महिलांसाठी विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. तरी नागपंचमी सणासाठी प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ८११ विषय क्रमांक - ३७

दिनांक - १७/७/२०१२

सुचक :- मा.विनया तापकीर अनुमोदक :- मा.निता पाडाळे

संदर्भ:- मा.विनया तापकीर, मा. निता पाडाळे यांचा प्रस्ताव -

श्री मोरया गोसावी मंदिराशेजारील पार्वती उद्यान (देऊळमळा उद्यान) येथे तसेच प्रभाग क्र.५४ मध्ये नागपंचमी निमित्त यशश्री महिला बचत गट संस्थेच्या वतीने नागपंचमी कार्यक्रमाचे आयोजन करण्यास व येणा-या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

**(जगदीश शेट्टी )**
सभापती
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/९७१/२०१२
दिनांक - १९/७/२०१२ चे लगत

प्र. नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत- सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.